24-02-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A


**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी. / मु.शी** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

अतिरिक्त सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज सोमवार, दिनांक 24 फेब्रुवारी 2014 रोजी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

**सभापती** : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(सोबत जोडलेले अभिभाषण छापावे.)

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. हेमंत टकले यांचा प्रस्ताव.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाल्यानंतर सभागृहाच्या वर्षानुवर्षाच्या प्रथा आणि परंपरानुसार त्यांच्या अभिभाषणाबद्दलचा अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहामध्ये मांडला जातो आणि त्यावर सदनामध्ये चर्चा होते. आजच्या सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर "माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव" ही बाब आहे. परंतु अभिभाषणावरील चर्चा मात्र पुढील अधिवेशनामध्ये होणार आहे. सभापती महोदय, अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर पुढील अधिवेशनामध्ये चर्चा होणार असेल तर माननीय राज्यपांलाच्या अभिभाषणावरील अभिनंदनाचा प्रस्ताव देखील पुढील अधिवेशनामध्ये मांडला जावा असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर मत व्यक्त करण्याचा सदनाचा अधिकार आहे. असे असताना आणि कोणतेही कारण नसताना आम्हाला जर त्या अधिकारापासून थांबविण्यात येत असेल तर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलचा आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव देखील पुढील अधिवेशनामध्ये मांडला जावा. या सदनामध्ये आम्हाला जे वैधानिक अधिकार प्राप्त झालेले आहेत ते अधिकार आम्हाला नाकारले जात आहेत अशी आमची भावना झालेली आहे.. या विषयाच्या संदर्भात मी यापूर्वी देखील चर्चा केलेली आहे.

**सभापती** : दिनांक 4 फेब्रुवारी 2014 रोजी झालेल्या कामकाज सल्लागार समिमतीच्या बैठकीमध्ये या बाबीवर सविस्तर चर्चा झालेली आहे. अनेक वेळा जेव्हा 4 महिन्याकरिता व्होट ऑन अकौण्टस् घेतले जाते त्यावेळी ज्या काही तरतुदी आहेत त्या तरतुदीच्या अनुषंगाने माननीय

**सभापती**...

राज्यपालांचे अभिभाषण झाल्यानंतर अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव त्या अधिवेशनामध्ये मांडला जातो आणि चर्चा पुढील अधिवेशनामध्ये होते. त्याप्रमाणे आज माननीय राज्यपालांचे जे अभिभाषण झाले त्यावरील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव आज मांडला जाईल व त्यास अनुमोदन दिले जाईल आणि अभिभाषणावरील चर्चा पुढील अधिवेशनामध्ये होईल. या विषयासंबंधी दिनांक 4 फेब्रुवारी 2014 रोजी झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली होती.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या मुद्यासंबंधी आपण निर्णय राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे. कारण असे पहिल्यांदाच घडत आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना प्रस्ताव मांडण्यास परवानगी देतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भातील निर्णय मी राखून ठेवीत असून तो मी योग्य वेळी देईन.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.......

मी दोन निर्णय घेतले आहेत. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडतील आणि त्या प्रस्तावाला माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे पाठिंबा देतील. मात्र आज या प्रस्तावावर चर्चा होणार नाही. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो वैधानिक मुद्दा उपस्थित केला तो देखील महत्वाचा आहे. त्या संदर्भात तपासून यथायोग्य पध्दतीने मी माझा निर्णय देईन.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो वैधानिक मुद्दा उपस्थित केला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्यात येऊन त्या प्रस्तावाला अनुमोदन दिल्यानंतर आपण या वैधानिक मुद्याबाबत निर्णय देणे योग्य होणार नाही. म्हणून आपला निर्णय होईपर्यंत हा प्रस्ताव राखून ठेवला पाहिजे असे माझे मत आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शिवसेना पक्षाचे गटनेते माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. त्यांनी वैधानिक प्रश्न उपस्थित केला आहे. आपण सांगितले की, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये प्रस्ताव मांडण्याचा निर्णय झाला आहे. कामकाज सल्लागार समितीपेक्षा हे सभागृह मोठे आहे. कामकाज सल्लागार समितीचा निर्णय बदलण्याचा अधिकार या सभागृहाचा आणि आपला आहे. नियमबाह्य कामकाज होत असेल तर ते थांबविणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यावर आमचे विचार मांडण्याचा आम्हाला घटनेने अधिकार दिलेला आहे. तो अधिकार शासन हिरावून घेऊ शकत नाही. घटनात्मक प्रश्न निर्माण झालेला असल्यामुळे त्या संदर्भात आपला निर्णय होत नाही तोपर्यंत आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडणे आणि त्या प्रस्तावाला अनुमोदन देणे हे घटनाबाह्य होईल असे मला वाटते. माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्यात येणार असेल तर आम्हाला त्या प्रस्तावावरील चर्चेपासून वंचित ठेवू नये. आवश्यक असल्यास अधिवेशनाचा कालावधी 10 दिवस वाढवावा. आचारसंहितेची कोणतीही अडचण येणार नाही. अधिवेशनाचा कालावधी 4 दिवसाचा निश्चित करुन आम्हाला आमचे विचार मांडण्यापासून वंचित ठेवायचे आणि कामकाज

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..........

उरकून घ्यायचे ही कृती योग्य ठरणार नाही. आम्हाला आमचे विचार मांडण्याचा जो अधिकार प्राप्त झालेला आहे त्या अधिकाराला न्याय देण्याचे काम आपण करावे. आपण न्यायाधीश आहात. आपण जोपर्यंत निर्णय देत नाही तोपर्यंत आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्यास अनुमती देऊ नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहाचे कामकाज घटनेप्रमाणे चालले पाहिजे. घटनेने जो अधिकार दिलेला आहे त्या अधिकाराला छेद देऊन सभागृहाचे कामकाज चालत असेल तर ते चुकीचे होईल.

सभापती महोदय, नामदार राज्यपालांनी जे अभिभाषण केले त्या अनुषंगाने आम्हाला काही मुद्दे मांडावयाचे आहेत.....(अडथळा).....मी अभिभाषणाचा मराठी भाषेतील अनुवाद पूर्णपणे ऐकला आहे........(अडथळा).....पाच वर्षापूर्वी देखील अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी अधिवेशनाचा कालावधी जास्त दिवसांचा होता. कामकाज व्यवस्थित चालले होते. परंतु आम्ही आपल्याशी चर्चा केली, प्रधान सचिवांशी चर्चा केली तेव्हा असे सांगितले गेले की, मागील वेळी जसे झाले तसेच आता केले पाहिजे. हे चुकीचे घडत आहे, हे थांबले पाहिजे.

नंतर सी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...

परंपरेने सभागृहाचे कामकाज चालते हे कुठे तरी थांबले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी जी हरकत घेतली आहे त्याचे मी समर्थन करीत असून कायदेशीर बाब तपासून घेऊन आपण निर्णय द्यावा अशी मी आपणास विनंती करीत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आदरणीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण सुरू असताना त्यांच्या अभिभाषणामध्ये माननीय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अडथळा आणला आणि आता येथे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्याचा आग्रह माननीय विरोधी पक्ष नेते धरत आहेत. मुळात त्यांनी ते भाषण ऐकलेले नाही. किंबहुना अशी एक पंरपरा..... (अडथळा).... माननीय राज्यपाल महोदयांचे पद हे घटनात्मक आहे. या पदाला गरिमा आहे. त्या पदाला सन्मान आहे. संयुक्त सभेत माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण सुरू असताना जो अभूतपूर्व गोंधळ घातला गेला, अवमानकारक वक्तव्य केले गेले ते निश्चितच निषेधार्ह आहे. एका बाजूला घटनेचा आधार घ्यायचा, घटनात्मक अधिकाराच्या गोष्टी करायच्या आणि दुसऱ्या बाजूला घटनात्मक कर्तव्यापासून दूर पळून मनमानी करायची असा प्रकार होत असेल तर तो कदापि योग्य नाही. पंरपरेचा विचार हा एका बाजूने न करता सगळ्या बाजूने करावा लागेल. हे वरिष्ठ सभागृह आहे असे आपण नेहमी बोलतो. ते मला देखील मान्य आहे. या सभागृहाला जेवढे महत्त्व आहे तेवढेच कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ठरलेल्या कामकाजाला देखील आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला जावा, त्याचे समर्थन केले जावे. त्यावरील चर्चा पुढे जेव्हा केव्हा ठरेल त्यावेळी व्हावी अशी माझी विनंती आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मी विनम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, समोरून ज्याचा उल्लेख अभिनंदन ठराव म्हणून होत आहे तो अभिनंदन ठराव नसून आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव आहे. अभिनंदन आणि आभार यामधील फरक आपणा सर्वांना समजून येईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. यामध्ये एक भाग नक्की आहे. ....(अडथळा)... सभपती महोदय, आता मला माननीय विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी बोलू दिले पाहिजे. ...(अडथळा)... आता मला बोलू दिलेच पाहिजे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांना सांगू इच्छितो की, आपण जे मुद्दे मांडले आहेत ते सर्वांनी ऐकले आहेत. आता सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले बोलत आहेत. तेव्हा त्यांचे म्हणणे देखील आपण ऐकले पाहिजे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात. त्यांना घटनात्मक दर्जा आहे. त्यांच्या पदाची गरिमा सांभाळण्यासाठी आपण जी कार्यपद्धती करतो ती घटनात्मकदृष्ट्या आवश्यक आहे, महत्त्वाची आहे. त्यामुळे मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य त्यांचे मन:पर्वूक आभार मानतो."

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देतो.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

**सभापती** : प्रस्ताव असा आहे की :-

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा विधान परिषदेच्या पुढील अधिवेशनात घेण्यात येईल.

(सत्ताधारी बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देतात.)

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2014 चा अध्यादेश क्रमांक 6- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2014 चा अध्यादेश क्रमांक 3- महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन 2014 चा अध्यादेश क्रमांक 2- महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सुरेश धस (सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2014 चा अध्यादेश क्रमांक 1- महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश, मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सुरेश धस : सभापती महोदय, सन 2014 चा अध्यादेश क्रमांक 4-महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2014 चा अध्यादेश क्रमांक 5- महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ अध्यादेश,मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: सन 2013-2014 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे**

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री ): सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2013-2014 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असतांना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203(3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2013-2014 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2013-2014 मधील खर्चाच्या पूरक विवरणपत्र सभागृहास सादर झाले आहे. विवरणपत्राच्या प्रती सन्माननीय सदस्यांसाठी टपालखणाद्वारे वितरित करण्यात येत आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या द्वारे माननीय वित्त मंत्र्यांना विचारु इच्छितो की, मागच्या अधिवेशनामध्ये जी चर्चा झाली होती त्या चर्चेमध्ये मार्च महिन्यात ज्या पुरवणी मागण्या मांडल्या जातील त्यावेळेस त्या ग्रीन बुक सोबत दिल्या जातील असे ठरले होते. त्यामुळे या पूरक मागण्या आपण ग्रीन बुक सोबत दिल्या आहेत ना ? ग्रीन बुक सह पुरवणी मागण्या नसतील तर आम्ही माननीय राज्यपाल महोदयांना त्या संदर्भात पत्र देऊ. कर्मचाऱ्यांचे पगार वगैर दिले जावेत यासाठी आम्ही थोडे मान्य केले होते. त्यामुळे सन 2013-2014 च्या पूरक मागण्या ग्रीन बुक सह देण्यात आल्या आहेत की, नाही याची माहिती कृपया माननीय वित्त मंत्र्यांनी द्यावी अशी विनंती करतो.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात अगोदर जी चर्चा झाली होती त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते सुध्दा उपस्थित होते. त्यावेळी वित्त विभागाच्या वतीने सन्माननीय सदस्यांच्या लक्षात ही बाब आणून दिली होती की, प्रत्येक पुरवणी मागण्यांच्या वेळी ग्रीन बुक सह त्या देता येणार नाहीत. परंतु हे लेखानुदान असून आज आपण पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करीत आहोत. यासंदर्भातही आपल्याला पूर्णपणे ग्रीन बुक देता येणार नाही. 31 मार्च अजून संपलेले नाही. पुढची सर्व कामे सुरु असल्यामुळे ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे अशी विनंती आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुरवणी मागण्या सभागृहासमोर सादर झालेल्या आहेत. पुरवणी मागण्यावंर या सभागृहात उद्या चर्चा होणार आहे. पुरवणी मागण्यावरील चर्चेचा उद्याचा पहिला आणि शेवटचा दिवस आहे. उद्या अर्थसंकल्प मांडला जाणार असल्यामुळे दुपारी 1.45 वाजता पुरवणी मागण्यावरील चर्चा संपेल. प्रथा परंपरेप्रमाणे अर्थसंकल्प मांडल्यानंतर त्या दिवशी सभागृहाचे कामकाज होत नाही. मी कामकाज सल्लागार समितीमध्ये आपल्याला विनंती केली होती की, पुरवणी मागण्यावरील उद्याचा पहिला व अंतिम दिवस असल्यामुळे सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले विचार अधिक स्पष्टपणे मांडण्यासाठी जास्त वेळ मिळण्याची आवश्यकता असून उद्याच्या दिवसाचे कामकाज अतिरिक्त झाले पाहिजे. उद्याचे सभागृहाचे कामकाज 11 वाजता सुरु न होता ते 9/9.30 वाजता सुरु करण्यात यावे अशी विनंती आहे. उद्याच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्यावेळी सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी कमी सहभाग घेतला तर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना आपले विचार अधिक चांगल्या प्रकारे मांडता येऊ शकतील. त्यामुळे उद्याचे सभागृहाचे कामकाज लवकर सुरु करावे अशी विनंती आहे.

**सभापती** : सभागृहाचे उद्याचे कामकाज सकाळी 9.30 वाजता सुरु करण्यात येईल.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या विषयावर कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा केली होती हे मला मान्य आहे. परंतु हे सार्वभौम सभागृह आहे. माननीय वित्तमंत्री उद्या लेखानुदान मांडणार आहेत तो अर्थसंकल्प नाही. अर्थसंकल्प मांडल्यानंतर सभागृहाची बैठक होत नाही अशी पध्दत आहे याबद्दल दुमत नाही. परंतु माझे असे म्हणणे आहे की, लेखानुदान हा अर्थसंकल्प नसेल तर लेखानुदान मांडल्यानंतर सभागृहाची बैठक अर्धा-पाऊण तासानंतर पुन्हा सुरु करण्यास हरकत नसावी. लेखानुदान हा अर्थसंकल्प नसेल आणि तो परंपरेमध्ये बसणारा विषय नसेल तर लेखानुदान मांडल्यानंतर सभागृहाची बैठक पुन्हा सुरु केल्यास सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवर आपले विचार मांडण्याची संधी मिळू शकेल अशी माझी भूमिका आहे. आताच येथे माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री आणि या सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी सांगितले की, ग्रीन बुक मिळणार नाही. आम्ही सर्व सांभाळून घ्यायचे. माझी विनंती आहे की, पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्यांना त्यांची मते मांडण्याकरिता प्रथा परंपरेमध्ये न बसणाऱ्या गोष्टींचा आदर करावा. लेखानुदान दुपारी 2.00 वाजता मांडल्यानंतर सभागृहाची बैठक काही वेळेपुरती स्थगित केल्यानंतर पुन्हा 4.00 ते 4.30 वाजता सुरु करावी जेणेकरुन पुरवणी मागण्यांवर उद्या पहिला आणि शेवटचा दिवस असल्यामुळे तो दिवस आमच्यासाठी सार्थकी लागेल अशी भावना मी व्यक्त करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, या विषयावर कामकाज सल्लागार समितीमध्ये अर्धा तास चर्चा झाली. त्यावेळी असे ठरले की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सकाळी 9.30 वाजता सुरु करुन ती दुपारी 2.00 वाजेपर्यंत थांबवावयाची.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : (अ) खालील विधेयकांना राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 42- महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक, 2009.

(2) सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 26- मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, 2012.

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 35 - महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक, 2013.

(2) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 37 - महाराष्ट्र कृषी विद्यापीठ (दुसरी सुधारणा ) विधेयक 2013.

(3) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 42- महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या ) ऊस दराचे विनियमन विधेयक, 2013.

(4) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 43- महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा ) विधेयक, 2013.

(5) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 44 - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी ) विनियोजन विधेयक, 2013.

(6) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 45- महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, 2013.

(7) सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 46- महाराष्ट्र विनियोजन (द्वितीय अधिक खर्च ) विधेयक, 2013.

-------

..3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषद नियम 8 च्या पोट नियम (1) अन्वये मी खालील सदस्यांची सभापती तालिकेवर नामनियुक्ती करतो.

(1) श्री.मोहन जोशी

(2) श्री.दीपकराव साळुंखे

(3) श्री. नागो पुंडलिक गाणार

(4) डॉ.नीलम गोऱ्हे

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. I OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.)

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक-1 महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक-1 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----------

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: श्री.हसमुखभाई वसंतराय उपाध्याय, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.हसमुखभाई वसंतराय उपाध्याय, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" श्री.हसमुखभाई वसंतराय उपाध्याय, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै.हसमुखभाई वसंतराय उपाध्याय यांचा जन्म दिनांक 4 जुलै, 1932 रोजी गुजरात राज्यातील सुरेंद्रनगर जिल्ह्यातील हलवत येथे झाला. त्यांचे शिक्षण पदवीपर्यंत झाले होते.

कै.उपाध्याय यांनी मालाड येथील एन.एल. हायस्कुलच्या कार्यकारिणीचे सदस्य, मालाड-कांदिवली एज्युकेशन संस्थेचे विश्वस्त तसेच हलवत शिक्षण संस्थेचे संस्थापक, दक्षता समितीचे सदस्य, मालाड सार्वजनिक मंडळाचे अध्यक्ष तसेच लायन्स क्लब, मालाडचे सेक्रेटरी म्हणूनही कार्य केले होते. मालाड येथील खादी ग्रामोद्योग भांडार व सरदार वल्लभभाई पटेल बहुउद्देशीय सभागृह उभे करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. मुंबई उपनगरातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै.उपाध्याय 1978 मध्ये कांदिवली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 1986 व 1992 असे दोन वेळा महाराष्ट्र विधान परिषदेवरही निर्वाचित झाले होते. ऑगस्ट 1978 ते फेब्रुवारी 1980 या काळात त्यांनी अन्न व नागरी पुरवठा, परिवहन खात्यांचे मंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 11 जानेवारी, 2014 रोजी दु:खद निधन झाले. त्यांना मी सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

--------

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.अजितदादा पवार यांनी कै.हसमुखभाई वसंतराय उपाध्याय, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, कै.हसमुखभाई उपाध्याय हे अगोदर काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते होते. त्यानंतर मोरारजीभाई व चंद्रशेखर यांनी जी संघटना काँग्रेस काढली, त्या संघटना काँग्रेसमध्ये त्यांनी प्रवेश केला आणि संघटना काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून काम केले. पुलोद सरकारमध्ये त्यांनी अन्न, नागरी पुरवठा व परिवहन मंत्री म्हणून काम केले. ते परिवहन मंत्री असताना स्थानिकांना रिक्षांचे परवाने दिले. उपनगरातील स्थानिकांना रिक्षांचा परवाना देण्याचा प्रयत्न कै.हसमुखभाई उपाध्याय यांच्या प्रयत्नातूनच झाला. किंबहुना त्यांनी अशा प्रकारचा उपक्रम त्या सरकारच्या माध्यमातून आग्रहपूर्वक करुन घेतला. स्थानिक ठिकाणी रिक्षा परवान्यांचे अर्ज गोळा करुन, त्यांची छाननी करुन ज्येन्युइन लोकांना रोजगार कसा मिळेल यासाठी प्रक्रिया उभी केली होती. राजकारणात असताना त्यांनी कांदिवली भागात मोठी शैक्षणिक संस्था उभी केली. आज त्या शैक्षणिक संस्थेमध्ये 17 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राजकारणाबरोबरच आपण ज्या भागातून निवडून आलो किंवा ज्या भागात राहतो त्या भागात शैक्षणिक, सामाजिक उपक्रम राबविण्याचे काम त्यांनी केले. ते लायन्स क्लबचे अध्यक्ष असताना त्यांनी लायन्स क्लबच्या सर्वात जास्त शाखा उघडल्या म्हणून जागतिक लायन्स क्लबच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला होता. ज्यांच्याकडे पैसा आहे अशा मंडळींना एकत्र आणून सामाजिक कार्य उभी राहावीत यासाठी त्यांनी लायन्स क्लबच्या शाखा सुरु केल्या होत्या. खादीचा प्रचार आणि खादी ग्रामोद्योगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर खुली विक्री केंद्रे सुरु करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

आपण ज्या विचारांशी जोडलो आहोत त्या विचारांचे काम प्रत्यक्ष जनतेपर्यंत कसे पोहचेल हे पाहणारे राजकीय, सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांचा परिचय होता. त्यांचे दु:खद निधन झाले आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावास समर्थन देताना, मी विरोधी पक्षातील सर्वांच्या वतीने हसमुखभाईंना विनम्रपणे आदरांजली अर्पण करतो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री यांनी श्री. हसमुखभाई वसंतराय उपाध्याय यांच्या दु:खद निधनाच्या संदर्भात शोक प्रस्ताव मांडला आहे. त्या संदर्भात भावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे. संसदीय कार्य पध्दतीमध्ये माझा त्यांच्याशी कधीही संबंध आला नाही. साधारणपणे सन 1982 नंतर हसमुखभाई यांचा प्रत्यक्ष परिचय मालाड भागात सातत्याने माझ्याशी येत होता. खासकरून, मुंबई उपनगरातील मालाड भागात त्यांनी त्यांच्या सामाजिक उपक्रमांचे चांगले जाळे विणले होते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आताच त्याबाबत उल्लेख केला. समाजातील सर्वसमावेशक असे ते व्यक्तिमत्व होते. त्यांचे सर्वांशी वेगळे नाते होते. त्यांना त्यांच्या नावाप्रमाणे लोक स्वीकारत होते. ते एका विशिष्ट विचारांचे म्हणजे गांधीवादी विचारांचे असले तरी ते सर्व पक्षांच्या संपर्कात येऊन, सामाजिक काम करताना सर्वांना बरोबर घेत असत. अनेक वेळा त्यांच्याशी माझा संबंध आला होता. त्या भागातील शिक्षण क्षेत्रात त्यांचा चांगला दबदबा होता. त्या भागातील गरीब मुलांच्या प्रवेशाकरिता 'हसमुखभाई' हा सर्वांचा परवलीचा शब्द होता. त्या भागातील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यायचा असेल तर हसमुखभाई स्वत: शब्द खर्च करून विद्यार्थ्यांना प्रवेश देत असत. अगदीच गरीब मुलांची शैक्षणिक जबाबदारी संस्थांमार्फत किंवा त्यांच्या संस्थांमार्फत ते घेत असत, हे मी स्वत: अनुभवले आहे. ते आता जेथे राहत होते, तेथेच कायमचे राहिले. हा संस्कार आहे. राजकीय नेत्यांची एवढी संपत्ती कशी वाढली या संदर्भात काल परवापासून 2 दिवस चर्चा सुरू आहे. हसमुखभाईंच्या संदर्भात हा विषय कधी उपस्थित होईल, अशी परिस्थिती नव्हती. ते सामान्यांमध्ये चालत चालत फिरायचे. त्यांचे राहते घर तेच आहे, ते तेथेच रहायचे. मी त्यांच्या घरी जात असे, चहा घेत असे. हा त्यांचा आपुलकीचा, जिव्हाळ्याचा ओलावा होता. त्या भागात ते आजही कार्यरत होते. आपल्या परीने शक्य तितकी मदत करणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी शेवटी त्या भागातील शिक्षण क्षेत्रात अधिक लक्ष घातले होते. ते सर्वांना मदत करीत होते. माझा त्यांच्याशी ज्येष्ठ म्हणून परिचय आला होता. आज ते आपल्यातून निघून गेले आहेत. ते विधानपरिषदेचे सदस्य होते. पुलोद काळात ते मंत्री होते. मी माझ्या, माझ्या पक्षाच्या, सहकाऱ्यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो. धन्यवाद !

----

..3

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी सर्वप्रथम आदरणीय कै. हसमुखभाई उपाध्याय यांना माझ्या, माझ्या पक्षाच्या व माझ्या कुटुंबीयांच्या वतीने श्रध्दांजली वाहतो. ते पश्चिम उपनगरातील फार मोठे कर्तृत्ववान उमदे नेतृत्व होते. त्यांनी त्या परिसरात उभ्या केलेल्या शिक्षण संस्था ताठ मानेने उभ्या आहेत. त्या संस्थांकडे स्वच्छ कारभार करणाऱ्या संस्था म्हणून पाहिले जाते. त्यांचे एन. एम. कॉलेज अतिशय चांगले आहे. हसमुखभाई हे दिवसातील 6-7 तास कॉलेजमध्ये बसत. एन. एम. कॉलेज म्हणजे उपनगराला फार मोठी देणगी आहे, असे मी समजतो. इतर कॉलेजमध्ये जे काही चालले आहे त्याकडे पाहून विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना असे वाटते की, सर्वप्रथम एन. एम. कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाले पाहिजे. माझा त्यांच्याशी सन 1987-88 मध्ये संबंध आला. ज्यावेळी ते मंत्री होते, त्यावेळी मी नुकताच राजकारणात आलो होतो. माझा त्यांच्याशी जिव्हाळ्याचा संबंध आला.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे..........

राजकीय क्षेत्रात आम्ही सर्व कार्यकर्ते भूमिका ठरवित होतो. सन 1998 मधील लोकसभेच्या निवडणुकीत मी पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. त्यावेळी माननीय हसमुखभाईंना असे वाटत होते की, गुजराती समाजातील व्यक्तीला उमेदवारी मिळाली पाहिजे. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी माझ्या उमेदवारीला विरोध केला होता. परंतु, एकदा उमेदवारी जाहीर झाल्यानंतर ज्या पध्दतीने त्यांनी निवडणुकीदरम्यान काम केले, ते माझ्यासारखा कार्यकर्ता कधीही विसरु शकणार नाही.

सभापती महोदय, माझ्या खासदारकीचा मतदारसंघ पालघरपर्यंत होता. मी प्रचार संपवून पालघरहून पक्षाच्या मुंबईतील केंद्रीय कार्यालयात रात्री उशिरा पोहोचायचो. त्यावेळी हसमुखभाई कार्यालयात उपस्थित असायचे आणि रात्री दोन ते अडीचपर्यंत कार्यालयात बसलेले असायचे. आम्ही सर्व कार्यकर्ते त्यांना सांगायचो की, खूप रात्र झाली आहे, आपण घरी जावे. परंतु, जोपर्यंत उमेदवार कार्यालयातून जात नाही, तोपर्यंत हसमुखभाई कार्यालयातच बसून असायचे. मतदारसंघात प्रचार केल्यानंतर अनेक वेळा मी उशिरा रात्री बारा ते साडेबारा पर्यंत कार्यालयात परतायचो. हसमुखभाई कार्यालयात असायचे आणि रात्री दोन ते अडीच पर्यंत थांबायचे. त्यांचे एवढे वय झालेले असताना आपल्या पक्षासाठी, आपल्या पक्षाच्या उमेदवारासाठी जो काही त्याग करायची वेळ येईल, तो करण्यास त्यांनी कधीही मागे-पुढे बघितले नाही. अशा प्रकारे त्यांनी त्या काळात ज्या पध्दतीने पक्षाचे काम केले आहे, ते आम्ही कार्यकर्ते कधीही विसरु शकणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय हसमुखभाईंचे निधन झाल्यानंतर माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार त्यांच्या घरी गेले. ते त्या ठिकाणी जवळ जवळ अर्धा तास होते. कै.हसमुख भाईंच्या शोकसभेला माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल हे देखील उपस्थित राहिले.

सभापती महोदय, कै.हसमुखभाई उपाध्याय यांनी त्यांच्या प्रदीर्घ अशा राजकीय व सामाजिक आयुष्यात जे कार्य केले आहे, ते आदरणीय असे आहे. त्यांचे कार्य समाज आणि कार्यकर्ते कधीही विसरु शकणार नाही. माझ्या वतीने, माझ्या कुटुंबीयांच्या वतीने आणि पक्षाच्या वतीने मी कै.हसमुखभाई उपाध्याय, माजी विधान परिषद सदस्य व मंत्री यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला माझ्या पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.हसमुखभाई वसंतराय उपाध्याय हे सन 1986 व सन 1992 असे दोन वेळा महाराष्ट्र विधान परिषदेवर निर्वाचित सदस्य म्हणून निवडून आले होते. त्यांनी शेवटपर्यंत खादी सोडली नव्हती. ते गांधीवादी कार्यकर्ते होते. वल्लभभाई पटेल बहुउद्देशीय सभागृह व मालाड येथील खादी ग्रामोद्योग भांडार उभे करण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले होते. ते जनमानसात मिसळलेले आणि सर्वांना हवेहवेसे वाटणारे नेते होते. माझ्या पक्षाच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण आवरते घेतो.

-------------

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी कै.हसमुख वसंतराय उपाध्याय, माजी विधान परिषद सदस्य व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे व अन्य सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

स्व.हसमुखभाई उपाध्याय हे ज्यावेळी राज्याचे मंत्री म्हणून काम करीत होते, त्या वेळपासूनचा त्यांचा व माझा परिचय आहे. मी त्यावेळी नुकताच निवडून आलो होतो व त्या संदर्भाने नवीनच आमदार होतो. अत्यंत चिवट पध्दतीचा सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ता आणि गोरगरीब, सामान्य समाजाच्या भावना व अडचणींचा सातत्याने पाठपुरावा करणारा हा नेता होता. अनेक राज्यस्तरीय संघटनांचे ते नेते व कार्यकर्ते होते.

कै.हसमुखभाई उपाध्याय हे सन 1978 ते 1980 च्या दरम्यान राज्याच्या मंत्रिमंडळाचे सदस्य होते. सन 1986 व सन 1992 असे दोन वेळा ते महाराष्ट्र विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते. दुर्दैवाने त्यांचे शनिवार, दिनांक 11 जानेवारी, 2014 रोजी दु:खद निधन झाले आहे. सभागृहाच्या नेत्यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यामध्ये मी माझ्याही भावना व्यक्त करतो आणि कै.हसमुखभाई उपाध्याय यांना श्रध्दांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

------------

यानंतर श्री.मारोती शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 25.2.2014 रोजी सकाळी 9.30 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 40 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 25.2.2014 रोजीच्या सकाळी 9.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही